साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

वर्षे 31 वे

। परखड अग्रलेख । वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे । करमाळेकरांची खास ओळख

**संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे**
**संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे**
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०

| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१२० | पाने-१२ | दि.७/४/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.




## केळीने दिला शेतकऱ्यांना हात


# ३२०० कंटेनर मधून ६४००० टन केळीची विक्री - २० ते ३२ रू. प्रतिकिलो दर मिळाला

करमाळा : यावर्षी शेतकऱ्यांना ऊस, कलींगड यांनी मारले पण केळीने तारले आहे. ऊसाला उतार चांगला मिळाला नाही, दरही अपेक्षीत मिळाला नाही, दर जाहीर झाला त्याचे पेमेंट नाही. कलींगडाला उत्पादन कमी व दर नगण्य मिळाला. त्यामुळे शेतकरी निराश झाले; पण ज्या शेतकऱ्याकडे केळी होती, त्यांची यावर्षी चांदी झाली आहे. यावर्षी २० ते ३२ रूपये किलो दराने केळी शेतकऱ्याच्या फडातून नेली आहे. त्यामुळे केळीतून प्रति एकरी किमान अडीच ते साडेतीन लाख रूपयेचे उत्पादन मिळाले आहे. विशेष म्हणजे यावर्षी ३२०० कंटेनर मधून ६४००० मे.टन केळी निर्यात झाली आहे.

याबाबत माहिती देताना तालुका कृषी अधिकारी म्हणाले, की करमाळा तालुक्यातून यावर्षी प्रथमच विक्रमी केळी निर्यात झाली व विक्रमी भावसुध्दा मिळाला आहे. यावेळी कंदर येथून ७३० कंटेनर मधून १४६०० मेट्रीक टन, वाशिंबे येथून ५२० कंटेनर मधून १०४०० मेट्रीक टन, वरकटणे येथून १२४० कंटेनर मधून २४८०० मेट्रीक टन, जेऊर येथून ७१० कंटेनर मधून १४२०० मेट्रीक टन अशी एकूण ३२०० कंटेनर मधून ६४००० मेट्रीक टन केळी निर्यात झाली आहेत.

यावर्षी ३५८४ हेक्टर मध्ये एक कोटी ३२ लाख ७५ हजार १३६ रोपांची लागवड झाली आहे. शिवाय खोडवा वेगळा आहे.

### तालुक्यात केळी संशोधन केंद्र सुरू केले पाहिजे



राज्यात केळी निर्यातीमध्ये करमाळा तालुका अग्रभागी आहे. सोलापूर जिल्ह्यात केळी लागवड वाढली आहे. त्यात करमाळा तालुक्यात ६० टक्के केली आहे. त्यामुळे येथे शेतकऱ्यांना केळी मार्गदर्शनासाठी केळी संशोधन केंद्र तात्काळ उभारले पाहिजे. यावर्षी परदेशात केळी उत्पादन घटले, त्याचा फायदा आपणाला झाला. पुढील वर्षी जर केळीला चांगला दर मिळवायचा असेलतर प्रत्येक शेतकऱ्याने गुणवत्ता प्रधान केळी उत्पादन केले पाहिजे. केळी लागवडीपासूनच रोप व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, औषधाचे योग्य नियोजन केले पाहिजे तसेच फळे लागल्यानंतर त्याची काळजी घेतली पाहिजे तरच निर्यातक्षम केळी उत्पादन होईल. अलीकडे जळगाव व गुजरात येथील केळी निर्यातक्षम केळी आहेत. तशी केळी आपण उत्पादन केली पाहिजे.

**...किरण डोके(केळी निर्यातदार-कंदर)**



संस्था चालवताना जे लोक रूपया रूपयाचा विचार करतात त्याचीच संस्था मोठी होते.

## संपादकीय.........................................!

# मकाई-आदिनाथचा संग्राम

आदिनाथ व मकाई सहकारी साखर कारखान्याच्या निवडणूका येऊ घातल्या आहेत. मकाईची प्रारूप मतदार यादी जाहीर झाली आहे. आदिनाथ व मकाई या दोन्ही निवडणूका बिनविरोध व्हाव्यात; अशी सर्वसामान्यांची इच्छा आहे. मकाईच्या बाबत मागे असेच झाले. राजकर्तेमंडळींनी माघार घेतली पण शेवटच्या क्षणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या उमेदवारांनी निवडणूक लढवण्याचे निश्‍चित केले व उमेदवारी अर्ज मागे न घेतल्यामुळे सहा विरोधी उमेदवारामुळे निवडणूक घ्यावी लागली होती. यावर्षी काय होणार ? याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

मकाईचा इतिहास मोठा रंजक आहे. मकाई कारखाना उभारणीचे स्वप्न माजी अध्यक्ष आप्पासाहेब झांजुर्णेयांनी पाहिले व ते माजी मंत्री कै.दिगंबरराव बागल यांनी पुर्ण केले. श्री.झांजुर्णेयांनी मकाई सहकारी साखर कारखाना लि;रामवाडी या नावाने १९९५-९६ साली बँकेत खाते उघडण्यास शासनाकडून परवानगी मिळवली होती. त्यावेळी कारखाना उभारणी करताना शासनाने कडक धोरण अवलंबल्यामुळे श्री.झांजुर्णेयांना ते शक्य झाले नाही. पुढे १९९९ च्या विधानसभा निवडणुकीत तत्कालीन आमदार दिगंबरराव बागल यांनी आपण निवडून आलो तर मकाई कारखाना उभारणी करू; असे आश्‍वासन दिले होते. त्यावेळी ते पुन्हा विजयी झाले पण त्यानंतर झालेल्या आदिनाथ कारखाना निवडणुकीत सन २००० मध्ये कै.बागल यांच्या गटाचा पराभव झाला. त्यामुळे त्यांनी जिद्दीने मकाई कारखान्याच्या उभारणीचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांनी शासनाकडे पुन्हा एकदा १६ जून २००० ला मकाईच्या नावे बँकेत खाते उघडण्यास परवानगी मिळवली. त्यानंतर कै.बागल यांचे प्रयत्न व शेतकर्‍यांचे पाठबळ यामुळे अवघ्या आठच दिवसात दीड कोटी रूपये भाग भांडवल जमा झाले. ते भांडवल त्यांनी जिल्हा बँकेत भरले. पुढे २४ ऑगस्ट २००० ला भिलारवाडी येथील जागा अधिकार्‍यांनी निश्‍चीत केली. त्यानंतर कै.बागल यांनी आपल्या सहकार्‍यांच्या मदतीने तिथे १२५ एकर जागा २५ हजार रूपये एकर प्रमाणे खरेदी केली. त्यावेळी मकाई कारखाना उभारणीचे बजेट मिटकॉनने २८ कोटी रूपयाचे दिले. त्या बजेट नंतर शासनाने भाग भांडवल म्हणून ८ कोटी ४० लाख मंजुर केले. त्यानंतर अन्य वित्तीय संस्थांनीही कारखान्याला तात्काळ कर्ज मंजूर केले. आर्थीक प्रश्‍न सुटल्यानंतर कै.बागल यांनी मागे पाहिलेच नाही. २ जून २००१ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांच्या हस्ते या कारखान्याचे भुमीपुजन झाले. त्यानंतर यंत्रणा मागवली. यंत्रणा आल्यापासून अवघ्या नऊ महिन्यात त्यांनी कारखाना उभारणी पुर्ण केली. त्यानंतर पुन्हा तत्कालीन मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांचेच हस्ते या कारखान्याचा गळीत चाचणी हंगाम २६ ऑक्टोबर २००२ रोजी सुरू झाला.

कारखाना उभारणी नंतर कै.बागल यांनी या कारखान्याच्या दृष्टीने नियोजनपूर्वक काम केले. हा कारखाना प्रतिदिनी १२५० मेट्रीक टन ऊस गाळपाचा असूनही येथे २००० ते २५०० मेट्रीक टनापर्यंत ऊस गाळप करण्याचे नियोजन केले होते. त्याचप्रकारे सध्याही गाळप होत आहे. सुरूवातीच्या टप्यात विक्रमी गाळप करून एक उच्चांक गाठला. त्यानंतर या कारखान्यास तांत्रीक क्षमता, जास्त गाळप, जास्त साखर उतारा असे देश पातळीवरचे पुरस्कार मिळाले. पुढे आप्पासाहेब झांजुर्णेयांना चेअरमन पदावरून कमी करून दिगंबरराव बागल हे चेअरमन झाले तर विलासराव घुमरे हे सचिव म्हणून कायम होते. सन २००४ च्या विधानसभा निवडणुकीत कै.बागल पराभूत झाले त्यानंतर त्याचा विपरीत परिणाम त्यांच्यावर झाला आणि दुर्दैवाने ५ फेब्रुवारी २००६ ला त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाच्यावेळी मकाईच्या निवडणूकीची प्रक्रिया सुरू होती. त्यावेळी विरोधकांनी बागल यांच्या निधनामुळे ही निवडणूक न लढण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे १३ फेब्रुवारी २००६ रोजी मकाईची पहिली निवडणूक बिनविरोध झाली. या निवडणुकीनंतर रश्मी बागल या कारखान्याच्या चेअरमन झाल्या. त्यानंतर सन २०११ मध्ये मकाईची दुसरी निवडणूक जाहीर झाली. त्यावेळी बागल गट विरूध्द परिवर्तन महाआघाडी उभी राहीली होती. या परिवर्तन महाआघाडीमध्ये गिरधरदास देवी, माजी आमदार जयवंतराव जगताप, विद्यमान आमदार नारायण आबा पाटील, नवनाथ झोळ आदीजण होते. जोरदार संघर्ष झाला पण त्यावेळी बागल गटाने विरोधकांना जवळपासही फिरकू दिले नाही. त्यावेळी पहिल्या टप्यात बागल गटाच्या ३ जागा बिनविरोध झाल्या होत्या. उर्वरीत १४ जागासाठी निवडणूक झाली. त्यासर्व जागा बागल गटाने मोठ्या फरकाने जिंकल्या. त्यावेळी बागल गटाचे नेतृत्व दिग्वीजय बागल यांनी केले होते.

मागील निवडणुकीवेळी बागल गटाचे मुख्य विरोधक जगताप गट यांचेबरोबरच बागल गटाने पालिका निवडणुकीत युती केली होती. तीच युती मकाई कारखाना निवडणुकीत कायम असल्याने बागल-जगताप यांना यशाची पुर्ण खात्री होती. अर्थातच त्यामुळे अन्य मुख्य विरोधकांनी आपल्या तलवारी म्यान केल्या. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध होणार; असे चित्र असतानाच स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी अर्ज भरले. त्यांचे अर्ज छाननीतही अर्ज बर्‍यापैकी मंजूर झाले. पण शेवटच्या क्षणी अवघे सहा उमेदवार निवडणुक रिंगणात राहिल्याने निवडणुक लागली व बागलगट त्यात यशस्वी झाला.

वास्तविक पाहता विरोधासाठी विरोध नसावा, यामध्ये दोन गटाचा विरोध असला तरी नुकसान होते ते संस्थेचेच. मकाईची स्थिती सध्याही कठीण आहे. गत हंगामात मकाईचे चेअरमन दिग्विजय बागल यांनी उस्मानाबाद जिल्हा सहकारी बँकेकडून व्यक्तीगत मालमत्ता गहाण ठेवून कर्ज घेतले. राजकियदृष्ट्या त्यांना पाठबळ मिळाले नाही. पण त्यांनी कारखाना चालू केला. जवळपास १ लाख ६० हजारापर्यंत गाळप केले. आसावणी प्रकल्प सुरू केला. पण साखर उतारा फारच कमी मिळाला म्हणजे पावणे आठ टक्केसुध्दा मिळाला नाही. आजही या कारखान्यावर कोट्यावधी रूपयाचे कर्ज असून ऊस उत्पादक शेतकरी, कामगार व इतर देणी राहीलेली आहेत. त्यामुळे हा कारखाना सध्यातरी आर्थिक चणचणीत आहे. अशा स्थितीत मकाईची निवडणूक झालीतर त्याचा कारखान्याच्या प्रगतीवर परिणाम होणार आहे. त्यामुळे बागल गटाने विरोधकांना विश्‍वासात घेऊन जमलेतर काही जागावर संधी देवून ही निवडणूक बिनविरोध करण्याची गरज आहे. बागल गटाला आपले धोरण बदलावे लागणार आहे. कारखान्यासाठी विकासाभिमुख निर्णय घेऊन वाटचाल करावी लागणार आहे. सभासदांनी गेलेल्या सर्व निवडणुकीत बागल गटाला समर्थन दिले आहे. एकमुखी सत्ता दिली आहे तरीही हा कारखाना गती का घेत नाही. कारखाना कर्ज मुक्त का होत नाही..? कै.मामा यांनी देश पातळीवरील पुरस्कार मिळवले, आता निदान कारखानातरी स्वयंभू होण्याची गरज आहे. साखर व्यवसाय अडचणीत असलातरी तुम्हाला अडचणी सांगून चालणार नाही. लोक अडचणी ऐकण्यासाठी नसतात तर यशाचे पोवाडे गाण्यासाठी किंवा टिका करण्यासाठी असतात; हे लक्षात घेतले पाहिजे. जर प्रगती केली तरच कै.बागल यांचा वारसा जतन केल्याचे त्यांना सांगता येणार आहे.

असो मकाईचे घोडेमैदान जवळ आले आहे. बागल गटाने व सर्वच त्यांच्या विरोधकांनी संस्थेसाठी योग्य निर्णय घेण्याची गरज आहे. जसा मकाईबाबत तसा आदिनाथ बाबतही निर्णय घेतला पाहिजे. जर मकाई कारखाना बागल गटाला बिनविरोध दिला तर बागल गटाने आदिनाथ कारखान्याचा मोह सोडून तो बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

## नागरीकांना वेठीस धरणाऱ्या ठेकेदारावर कार्यवाही करावी : फारूक जमादार

करमाळा (सं.प्र.) : करमाळा नगरपरिषदेने शहर स्वच्छ व साफसफाई करण्याचा ठेका विनीत पांडूरंग देवरे वेस्टेक बायोन्हेंवर ग्रुप नाशिक या कंपनीस १२ लाख ४८ हजार ८४८ रोजी प्रती महिना नगरपालिकेच्या अटी व शर्तीवर मंजूर करण्यात आला होता. परंतू सदर ठेकेदाराने सर्व अटी, शर्तीचा भंग केला असून याबाबतची चौकशी करून आरोग्य विभागातील शहर स्वच्छता साफसफाई ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी; अशी मागणी करमाळा अर्बन बँकेचे माजी उपाध्यक्ष फारूक जमादार यांनी जिल्हाधिकारी यांना पाठविलेल्या लेखी निवेदनाव्दारे केली.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की करमाळा नगरपरिषदेकडे आरोग्य विभागातील साफसफाई करणारे ठेकेदारा-विषयी माहिती मिळण्याकामी अनेकवेळा लेखी अर्ज दिला होता, परंतू पालिकेने याबाबत कोणतीही माहिती दिली नाही. सदरची माहिती मिळाल्यानंतर या माहितीमध्ये ठेकेदाराने स्वच्छता साफसफाईचे बिलाची नोंद आवक रजिस्टर मध्ये दिसत नाही. सदर ठेकेदाराने कोणतीही पूर्वसूचना न देता १५ दिवस कामबंद आंदोलन केले होते. तसेच माजी नगराध्यक्ष यांच्या वाढदिवसानिमित्त ऑगस्ट महिन्यात पंढरपूर येथील साठ कर्मचारी आणून दहा दिवस शहरातील गटारीची सफाई करून सार्वजनिक ठिकाणची साफसफाई केली होती. परंतू याचेही बील ठेकेदाराला देण्यात आले. सदर ठेक्यामध्ये पालिकेचे कायम कर्मचारी काम करताना दिसत आहे. सफाई कामगारांना कुठलीही सुविधा नाही. हॅन्डग्लोज, पायातील बुट, मास्क आदी साहित्य पुरविण्याची जबाबदारी ठेकेदाराची आहे. जंतुनाशक पावडची फवारणी केलेली दिसून येत नाही तर फिनेल नगरपालिका खरेदी करत नसल्याचे समजते. ठेकेदार कामगारांना ३०० ते ४०० रू. रोज पगार देतो. सुट्टी असलीतर पगार दिला जात नाही. अशा अनेक बाबी समोर आले असून शहरास वेठीस धरणार्‍या ठेकेदाराची योग्य ती चौकशी करून कडक कारवाई करावी; अशीही मागणी जमादार यांनी केली आहे.

## शिष्यवृत्ती स्पर्धेत अमरनाथ चिवटे राज्यात चौदावा

करमाळा(सं.प्र.) : शहरातील गुरूकुल पब्लिक स्कुलचा चौथी मधील विद्यार्थी अमरनाथ महेश चिवटे याचा भारतीय अभिरूप शिष्यवृत्ती स्पर्धेत राज्यात १४ वा तर जिल्ह्यात आठवा क्रमांक आला आहे. अमरनाथला सारीका चेंडगे व सिध्दी रोकडे, आई अपर्णा चिवटे यांनी मार्गदर्शन केले. अमरनाथ चिवटे हा गुरूकुल पब्लिक स्कुलचा विद्यार्थी असून या संस्थेचे अध्यक्ष नितीन भोगे यांनी अमरनाथचे विशेष अभिनंदन केले.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# राजुरी येथे भव्य वारकरी बालसंस्कार शिबीर

## १ मे ला शिबीराचा प्रारंभ, २३ मे ला सांगता

करमाळा(सं.प्र.) : राजुरी येथे १ मे ते २३ मे या कालावधीत जिल्हापरिषद प्राथमिक शाळेत भव्य वारकरी बालसंस्कार शिबीर आयोजित करण्यात आले आहे; अशी माहिती आयोजक व अध्यापक ह.भ.प.किशोर महाराज जाधव(राजुरीकर) यांनी दिली.

आजच्या संगणकीय युगात तरूण पिढीमध्ये धार्मिकता, बाल मनावर सुसंस्कार घडून पुढील पिढी संस्कारीत व्हावी. त्याचबरोबर आपला धर्म काय ? आपली संस्कृती काय ? आपला आचार-विचार कसा असावा; हे कळणे काळाची गरज आहे. हा मुख्य उद्देश ठेवून राजुरी येथे बालसंस्कार शिबीर आयोजित केले आहे.

या शिबीराचा प्रारंभ १ मे रोजी सायंकाळी सहा वाजता ह.भ.प.एकनाथ महाराज हंडे राजुरकर, ह.भ.प.संजयानंद झानपुरे महाराज साडे, ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली महाराज झोळ वाशिंबे यांचे हस्ते होणार आहे. यावेळी आमदार संजयमामा शिंदे, माजी आमदार जयवंतराव जगताप, नारायण पाटील, मकाई कारखान्याचे चेअरमन दिग्विजय बागल, दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, भाजपा संघटन महामंत्री सोलापूर चे धैर्यशील मोहिते-पाटील, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, बारामती ॲग्रोचे उपाध्यक्ष सुभाष गुळवे, तहसीलदार समीर माने, गटविकास अधिकारी मनोज राऊत, पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे, ग्रामपंचायत राजुरीचे प्रशासक देविदास सारंगकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या शिबीराची सांगता २३ मे रोजी होणार आहे.

या शिबीरात शिबीरार्थींची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

शिबीरामध्ये पहाटे पाच ते सहा मृदंग सराव, सकाळी सहा ते सात योगासने, सात ते आठ दैनंदिन नित्यक्रम प्रार्थना, आठ ते नऊ नाष्टा, नऊ ते अकरा मृदुंग व गीता क्लास, अकरा ते बारा हरिपाठ पाठांतर, दुपारी बारा ते एक जेवण, एक ते तीन विश्रांती. त्यानंतर दुपारी तीन ते चार प्रवचन, चार ते सहा हरिपाठ, सायंकाळी सहा ते सात जेवण नंतर सात ते नऊ व्याख्यान, भजन व किर्तन असे दैनंदिन कार्यक्रम राहणार आहेत.

शिबीरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी सोबत ताट, अंथरूण, पांघरून व नित्य लागणाऱ्या वस्तू तसेच पांढरी टोपी, पॅंट किंवा धोतर, नेहरू शर्ट, टोपी, उपरणे सोबत घेवून येणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांकडे मोबाईल व महागड्या वस्तु जवळ देता येणार नाहीत. या शिबीरात तिसरी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाणार आहे. शिबीरात विद्यार्थ्याला जे वाद्य शिकायचे आहे ते स्वत:चे असावे. गैरवर्तन करणाऱ्यास पालकांना सांगून घरी पाठवण्यात येईल.

शिबीरामध्ये विद्यार्थ्यांना दररोज अनुभवी तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन तसेच ह.भ.प.महादेव महाराज साखरे यांची प्रवचन सेवा राहणार आहे. या संपूर्ण शिबीरात संतोष (काका) कुलकर्णी, गंगाधर नारायण कुलकर्णी (पुणे), सुधीर मुरलीधर कुलकर्णी, विठ्ठल निवृत्ती बोबडे हे अन्नदानाची सेवा बजावणार आहेत. शिबीरामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी भ्रमणध्वनी ७०५७१७९४२४ या क्रमांकावर संपर्क साधून नांवनोंदणी करावी; असेही आवाहन आयोजकांनी केले आहे.

# देवळाली येथे १८ ते २१ एप्रिल दरम्यान शिवजयंती उत्सव



करमाळा(सं.प्र.) : शिवजयंती उत्सव समिती देवळाली व राहुल कानगुडे, सुधीर आवटे मित्र परिवार यांचे वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून १८ ते २१ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवजयंती उत्सवानिमित्त १८ एप्रिलला किर्तन, १९ एप्रिलला भव्य खुल्या राज्यस्तरीय डान्स स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत प्रथम बक्षीस ११ हजार रू., द्वितीय बक्षीस ७ हजार रूपये, तृतीय बक्षीस ५ हजार रूपये, चौथे बक्षीस ३ हजार रूपये व उत्तेजनार्थ बक्षीस १ हजार रूपये ठेवण्यात आले आहे. २० एप्रिलला शिव व्याख्यान होणार असून, २१ एप्रिलला सकाळी नऊ वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज मुर्तीचे पूजन व सायंकाळी सहा वाजता भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. तरी यावेळी शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे; असे आवाहन उत्सव समितीने केले आहे.

**ओजस हॉस्पिटल**
OJS HOSPITAL
AlIOPATHY AYURVED HOMEOPATHY
डॉ.रोहन रामदास कुंभार B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार M.D. कन्सलटींग फिजीशीयन
डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट
* वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ * * २४ तास अत्यावश्यक सेवा *
डॉ.सौ.सायली मनोज कुंभार M.sc. Biotech, Health & Nutritionआहारतज्ञ
ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार ● हृदयरोग व उच्च रक्तदाब ● मधुमेह ● थायरॉईड ● संधिवात ● पोटाचे आजार ● स्त्रियांचे आजार ● श्वसनसंस्थेचे आजार ● मणक्यांचे व हाडांचे विकार ● मुतखडा ● मुळव्याध ● सौंदर्य समस्या ● त्वचारोग व केशविकार ● आहारविषयक मार्गदर्शन..
उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा)
Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत)
PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test
(गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)
पत्ता : चिवटे बंधू मिठाईवाले यांच्या समोर, घोलप ज्वेलर्सच्या वरच्या मजल्यावर सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. ● संपर्क : मो.9960334005, 9423333950

# मकाई सहकारी साखर कारखाना निवडणूक

## प्रारूप मतदार यादी प्रसिध्द - २४ एप्रिलला अंतिम यादी प्रसिध्द होणार

करमाळा (सं.प्र.): भिलारवाडी येथील श्री मकाई सहकारी साखर कारखाना निवडणुकीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. या कारखान्याच्या निवडणुकीसाठी प्रारुम मतदार यादी २७ मार्च रोजी प्रसिध्द झाली असून या मतदार यादीवर ५ एप्रिल पर्यंत हरकती घेण्यात आल्या आहेत. त्यानंतर ६ ते १७ एप्रिल दरम्यान आलेल्या हरकतीवर निर्णय दिला जाणार आहे. त्यानंतर २४ एप्रिलला अंतिम मतदार यादी प्रसिध्द केली जाणार आहे. हा निवडणूक कार्यक्रम जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) राजेंद्रकुमार दराडे यांनी प्रसिध्द केला आहे.

मकाई कारखाना स्थापनेपासून बागल गटाच्या ताब्यात असून बागल गटाचे युवा नेते दिग्विजय बागल हे दोन पंचवार्षिक पासून कारखान्याचे चेअरमन आहेत. सध्या कारखाना मोठ्या आर्थिक अडचणीत आहे. अशा परिस्थितीत मकाईची निवडणूक कशी होणार.. या विषयी चर्चा सुरु आहे. मागील निवडणुकीत शेतकरी संघटनेने उमेदवार उभे केले होते. श्री मकाई सहकारी साखर कारखाना हा सहकारी संस्था समिती निवडणूक नियमानूसार अ वर्गातील सहकारी संस्था आहे. या कारखान्याच्या संचालक मंडळाची मुदत २९ जानेवारी २०२२ ला संपली आहे.

# वांगी नं.१ येथील झोटींगबाबा मंदिर समोरील सभामंडपाचे उद्‌घाटन



करमाळा(सं.प्र.) : वांगी क्र.१ येथील झोटींगबाबा मंदिरसमोर बांधलेल्या सभामंडपाचे उद्घाटन आमदार संजयमामा शिंदे यांच्या हस्ते झाले. या सभामंडपाला आमदार शिंदे यांनी २०२२-२३ मधून आपल्या स्थानिक विकास निधीमधून निधी दिला होता. यावेळी माजी जिल्हापरिषद सदस्य निळकंठ देशमुख, चिखलठाणचे सरपंच चंद्रकांत सरडे, अर्जुन रकटे, सुहास रोकडे, माजी ग्रामपंचायत सदस्य रोहिदास सातव, अशोक तकीक, माजी जि.प.सदस्य उध्दव माळी, सोमनाथ रोकडे, राजाभाऊ देशमुख, तात्यामामा रोकडे, मांगीचे सुजित बागल, अभिमान अवचर, सांगवीचे उपसरपंच वैभव तळे, वांगी नं.१ चे सरपंच संतोष देशमुख, उपसरपंच अमोल दैन ग्रामस्थ उपस्थित होते.

**प्रियंका आय केअर हॉस्पीटल**
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
मो.9423222266, 9604762600
डॉ.डी.बी.केमकर (M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
उपलब्ध सुविधा...
● मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
● जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
● फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
● सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
● जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
● नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार ● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

**गाळे भाड्याने देणे आहे**
करमाळा येथील दत्तपेठेतील व्यापारी दुकान गाळे तसेच
1BHK, 2BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे
* संपर्क : मो.7385218013

# सकल जैन समाजाच्या वतीने महावीर जयंती साजरी




करमाळा(सं.प्र.) : करमाळा सकल जैन समाजाच्या वतीने जैन धर्माचे २४ वे तिर्थंकर भगवान महावीर यांच्या जन्मकल्याणक निमित्त करमाळा शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी सर्व जैन समाजातील नागरीकांकडून त्यांना अभिवादन करण्यात आले. या मिरवणुकीत श्रावक पांढऱ्या शुभ्र तर श्राविकांनी केशरी वस्त्र परिधान केले होते. सजविलेल्या पालखीत भगवान महावीरांची प्रतिमा ठेवून करमाळा शहरातील मेनरोडवरील दिगंबर जैन मंदिर येथून मुख्य रस्त्यावरून मिरवणुकीस सुरूवात झाली. पुढे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. भगवान महावीर की जय.., जैन धर्म की जय.., अहिंसा परमो धर्म की जय.. अशा घोषणा देण्यात आल्या. या जन्मकल्याणकाच्या निमित्ताने रक्तदान शिबीराचेही आयोजन केले होते. या शिबीरात ५५ समाजबांधवांनी रक्तदान केले.

# जिल्हा बँकेच्या कर्ज परतफेड योजनेस मुदतवाढ मिळावी : श्री.जगताप



करमाळा(सं.प्र.) : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कर्ज परतफेड ओटीएस योजनेला ३० जून पर्यंत मुदतवाढ मिळावी; अशी मागणी बँकेचे माजी व्हा.चेअरमन व माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी केली आहे. याबाबत श्री.जगताप यांनी राज्याचे सहकार मंत्री अतुल सावे, सहकार आयुक्त व निबंधक तसेच जिल्हा बँकेचे प्रशासक कुंदन भोळे यांना निवेदन दिले आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की.. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेने कर्जदार सभासदांकडील थकबाकी वसुलीसाठी व शेतकरी सभासदांना थकबाकी भरताना सवलत मिळावी; या उद्देशाने एकरकमी परतफेड योजना अंमलात आणली. या योजनेत सहभाग घेतलेल्या विविध कार्यकारी संस्थांच्या सभासदांना बँकेच्या धोरणानूसार पीक कर्ज वाटप करण्याचे धोरण देखील अवलंबिले आहे. सदरची योजना शेतकरी सभासदांसाठी अतिशय चांगली, उपयुक्त व व्याजात सवलत मिळणारी आहे. या योजनेला कर्जदार सभासदांनी चांगला प्रतिसाद दिल्यामुळे शेतकरी, वि.का.सोसायटी व पर्यायाने जिल्हा बँकेच्याही कर्ज थकबाकी वसुलीस चांगला हातभार लागलेला आहे. करमाळा तालुक्यातील कर्जदार सभासदांची आणखी ओटीएस योजनेत सहभाग घेण्याची इच्छा आहे. परंतू करमाळा तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची बहुतांश साखर कारखान्यांनी गळीत हंगाम संपून बराचसा कालावधी लोटून देखील अद्यापही ऊस बिले अदा केलेली नाहीत. त्यामुळे कर्जदार सभासदांची ओटीएस योजनेत सहभाग घेण्याची इच्छा असताना देखील ते या योजनेपासून वंचित राहिलेले आहेत. तरी शेतकरी हिताच्या या योजनेच्या मुदतवाढीचा विचार करून ३१ मार्च २०२३ रोजी वंचित राहिलेल्या सभासदांना या योजनेत सहभाग घेण्यासाठी ३० जून २०२३ अखेर पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी; अशी मागणी माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी केली आहे.


डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना श्रीजय नेत्र रूग्णालय

डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)

B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A


करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.

वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध

श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)

श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३


# जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज यांचा प्रवचन दर्शनाचा कार्यक्रम करमाळ्यात घेणार : श्रेणिक खाटेर




करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यात सर्वांच्या सहकार्यातून नरेंद्र महाराजांचा प्रवचनाचा कार्यक्रम भव्य-दिव्य स्वरूपात घेण्यात येणार असल्याची माहिती भागवत कथा ज्ञानयज्ञ समितीचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते श्रेणिकशेठ खाटेर यांनी व्यक्त केले आहे.

जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज यांचे कार्य दीपस्तंभासारखे आहे. त्यांच्या सहवासाचा दर्शनाचा लाभ घेऊन जीवन धन्य झाले. करमाळा शहरामध्ये प्रवचन दर्शनाच्या कार्यक्रमासाठी नरेंद्र महाराजांनी येऊन आम्हाला उपकृत करावे; अशी विनंती श्री.खाटेर यांनी महाराज यांचे स्विय सहाय्यक महेश परब यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी श्री.खाटेर यांनी भागवत कथा, रामकथा, शिवमहापुराण कथा इ. धार्मिक कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले असल्याचे महाराजांना सांगितले व सोलापूर जिल्ह्यात करमाळा तालुका तुमच्या प्रवचन दर्शनाच्या कार्यक्रमापासून वंचित राहिला आहे. भागवत कथा समिती व नरेंद्र महाराज भक्त सेवा मंडळाच्या माध्यमातून हा कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचेही श्री.खाटेर यांनी सांगितले. तसेच तुमच्या विनंतीनूसार उपलब्ध वेळ व तारखेनूसार करमाळ्याला प्रवचन दर्शन कार्यक्रमाची तारीख देण्याची विनंतीही श्री.खाटेर यांनी केली आहे. य

यावेळी भागवत कथा ज्ञानयज्ञ समिती अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते श्रेणिकशेठ खाटेर, जगद्गुरू नरेंद्राचार्य भक्तसेवा मंडळाचे दिनेश मडके, पतंजली योग समितीचे हनुमानसिंग परदेशी, सामाजिक कार्यकर्ते चरणसिंग परदेशी, संतोष वीटकर यांनी महाराजांचे दर्शन घेऊन कार्यक्रमाची तारीख देण्याची विनंती केली. यावर जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज यांनी सदर कार्यक्रमाचे निमंत्रण स्वीकारले असून आपणच लवकरच तुमच्या करमाळ्याला प्रवचन कार्यक्रम देऊ; असे सांगितले.

# ११ एप्रिलला म.फुले जयंती उत्सव - रक्तदान शिबीर व खंडू डोईफोडे यांचे व्याख्यान



करमाळा (सं.प्र.) : क्रांतीसुर्य प्रतिष्ठानच्या वतीने ११ एप्रिल रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवामध्ये ११ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता म.फुले यांच्या स्मारकास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण कार्यक्रम होणार असून त्यानंतर सकाळी अकरा ते दोन रक्तदान शिबीर घेण्यात येणार आहे. तसेच सायंकाळी चार वाजता सुप्रसिध्द व्याख्याते खंडु डोईफोडे यांचे 'क्रांतीसुर्य म.ज्योतीबा फुले सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील एक महानायक' या विषयावर व्याख्यान होणार आहे. व्याख्यानाचा कार्यक्रम यशकल्याणी सेवाभवन, पुणे रोड, करमाळा येथे होणार आहे. तरी या कार्यक्रमास नागरीकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.


महाराष्ट्रात प्रथमच...

गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा

आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !

२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर

एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस

सुभद्रा पॉवर सोल्युशन्स

प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337

श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे 7588506719

शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

तोच विश्वास, तीच सेवा

प्रोप्रा : अमोल र. हिरण
मो.9270496867, 7057258385

आनंद ड्रायफ्रुटस् & गरम मसाला

• खास उन्हाळ्याकरीता...
थंडाई बोटल, ताक मसाला, कोकम सरबत, आवळा कँडी, वाळा सरबत, रसना, सब्जा बी, वाळा जुडी, रोझ सिरप, आईस्क्रिम पावडर, खडीसाखर, प्रदाळयुक्त गुलकंद, पापड आटा पापड मसाला, पापड खार, मोहरी डाळ, मेथी,लोणचे मसाले...

उत्कृष्ट कंपनीचे व क्वॉलिटीचे ड्रायफ्रुट

केक भांडी, चॉकलेट क्रंची, टर्निंग टेबल नोजल रशियन आईस्क्रिमचे सर्व साहित्य तसेच केक व वाढदिवस डेकोरेशन सजावट साहित्य मिळेल !

एकवेळ अवश्य भेट द्या..!

एच.यु.गुगळे कापड दुकान समोर, मेनरोड, करमाळा.

# राज्यस्तरीय पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेत संदेश पोळ चे यश



करमाळा(सं.प्र.) : शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (एड्राव), ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर. यांच्या वतीने आयोजित इंजिनिअरींग कॉलेज विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तर पेपर प्रेझेंटेशन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत यशवंतराव चव्हाण पॉलिटेक्निक कॉलेज इचलकरंजी येथील विद्यार्थी व शेटफळ येथील रहिवाशी संदेश गजेंद्र पोळ याने संगणक शास्त्र विषयात द्वितीय क्रमांक मिळवून यश संपादन केले आहे. १ एप्रिल रोजी झालेल्या या स्पर्धेत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील इंजिनिअरींग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. संदेश पोळ हा पॉलिटेक्नीकल डिप्लोमाच्या द्वितीय वर्षात शिकत असूनही त्याने या स्पर्धेत भाग घेतला व आर्टिफिशियल इंटेलेजन्स ॲन्ड डेटा सायन्स या विषयावर पेपर प्रेझेंट करून यश मिळवले. त्याला डी.के.टी. कॉलेज च्या संगणक शास्त्र विभागातील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# सुमित्राताई घोलप यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस ग्रंथतुला करून साजरा



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहराच्या माजी उपनगराध्यक्षा श्रीमती सुमित्राताई(आक्का) घोलप यांचा ७५ व्या अमृतमहोत्सवी वाढदिवस ग्रंथतुला करून व विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. अमृतमहोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा विकी मंगल कार्यालयात संपन्न झाला. यावेळी ह.भ.प.डॉ.बाबूराव हिरडे यांचे प्रवचन झाले. यावेळी श्रीमती घोलप यांचा ग्रंथतुला कार्यक्रम संपन्न झाला. या ग्रंथतुलेत विविध धार्मिक व पौराणिक ग्रंथ होते. या कार्यक्रमानंतर हे ग्रंथ व विठ्ठल-रूक्मीणीची मुर्ती उपस्थित महिलांना भेट देण्यात आली. श्रीमती घोलप यांचा सत्कार करण्यासाठी नागरीकांची झुंबड उडाली होती. सकाळपासून घरी सत्कार चालू होते ते रात्री उशीरापर्यंत लोक शुभेच्छा देत होते. या कार्यक्रमास मकाईचे चेअरमन दिग्विजय बागल, म.राज्य साखर संघाच्या सदस्या रश्मी बागल-कोलते यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, माजी नगराध्यक्ष प्रशांत ढाळे, अमोद संचेती, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब सावंत, सोमनाथ चिवटे, अल्ताफशेठ तांबोळी, ॲड.कमलाकर वीर, माजी नगरसेवक संजय सावंत, प्रविण जाधव, अतुल फंड, राजू आव्हाड, महादेव फंड यांचेसह आदिनाथचे माजी चेअरमन संतोष पाटील, व्यापारी विठ्ठलराव सावंत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, जय महाराष्ट्र मित्र मंडळाचे प्रविण कटारिया व त्यांचे सर्व सहकारी सदस्य, मुख्याधिकारी बालाजी लोंढे, लातूरच्या मुख्याधिकारी वीणा पवार, उद्योजक सुनील लुणिया, भरतभाऊ आवताडे, विजय लावंड, अमोल यादव, सचिन गायकवाड यांचेसह डी.ग्रुपचे सर्व सदस्य व बहुसंख्य मान्यवर उपस्थित होते. रामचंद्र घोलप, डॉ.अविनाश घोलप, नितीन घोलप, संतोष घोलप, विजय घोलप, कमलाकर घोलप, सचिन घोलप यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सुत्रसंचालन चंद्रशेखर जोगळेकर यांनी केले. उपस्थितांचे आभार नितीन घोलप यांनी मानले.

# केम येथील श्री उत्तरेश्वर देवस्थान अन्नछत्राच्या वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न

करमाळा(सं.प्र.) : केम येथील जागृत ग्रामदैवत श्री उत्तरेश्वर मंदिरात अन्नछत्राच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये उत्तेश्वर महाराज यांच्या शिवलिंगास लघु रूद्राभिषेक केम मधील अकरा ब्राह्मणांनी केला. त्यानंतर २१ दांम्पत्याच्या हस्ते सत्यनारायण महापुजा करण्यात आली. त्यानंतर सत्यनारायण महाराज, उत्तरेश्वर महाराज व अन्नपूर्णा मातेची आरती करनू महाप्रसादाला सुरूवात झाली. यामध्ये केम ग्रामस्थ व पंचक्रोशीतील हजारो भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. चेअरमन दादासाहेब गोडसे यांच्या हस्ते मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. यावेळी पुजारी समाधान गुरव यांनी उत्तरेश्वर महाराजांचे श्री संत तुकाराम महाराज यांच्या विषयातील आकर्षक अशी सजावट केली होती. यासाठी रक्तदाते संघटनेचे कार्यकर्ते बाळासाहेब साखरे, गणेश शेटे, दत्ता पाटील, दत्ता देवकर, केदार पळसकर, समाधान फरड, अण्णा मोरे, चंद्रकांत तळेकर यांनी परिश्रम घेतले. यावेळी महिलांची जेवणाची व्यवस्था सौ.गोडसे, पुष्पा शिंदे, रत्नमाला साखरे यांनी चोख पार पाडली. उपस्थितांचे आभार उत्तरेश्वर रक्तदाते संघटनेचे सचिव दत्तात्रय कुलकर्णी यांनी मानले.

इथं सौंदर्य जन्म घेतं..
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा मो.9172092187
होलसेल साडी डेपो
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
साड्यांचा भरपूर स्टॉक व भरपूर व्हरायटीमध्ये उपलब्ध !
घरगुती विक्रीसाठी साड्या होलसेल दरात मिळतील
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186



# दहिगाव उपसासिंचन योजनेचे ११ एप्रिल पासून उन्हाळी आवर्तन

करमाळा(सं.प्र.) : दहिगाव उपसासिंचन योजनेचे रब्बी आवर्तन ५ जानेवारीपासून टेल टू हेड प्रमाणे सुरू झालेले असून ते २८ फेब्रुवारी रोजी संपणे अपेक्षित असतानाही अद्यापही सुरुच आहे. हेडकडील काही गावे अद्यापही रब्बी आवर्तनापासून वंचित आहेत. या गावांना १० एप्रिल पर्यंत पाणी देण्याचे नियोजन आहे. तसेच ११ एप्रिल पासून या सिंचन योजनेचे उन्हाळी आवर्तन टेल टू हेड याप्रमाणेच सुरू होईल; अशी माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली.

११ ते १४ एप्रिल पर्यंत टेल चारीने घोटी आणि मलवडीला पाणी मिळेल. १५ ते १६ एप्रिल उजवी चारी क्र.११ या चारीने निंभोरे, १७ ते २२ एप्रिल चारी क्र.६ वरून घोटी, वरकुटे, साडे व आळसुंदे तसेच २३ ते २४ एप्रिल उजवी चारी क्र.१० वरून निंभोरे व २५ ते ३० एप्रिल उजवी चारी क्र.९ वरून निंभोरे, लव्हे तसेच १ ते ४ मे डावी चारी क्र.४ वरून साडे, कोंढेज या गावांना पाणी मिळणार आहे. ५ ते ६ मे रोजी डावी चार क्र.३ वरून सौंदे, साडे, फिसरे, सालसे या गावांना तर ७ ते १० मे रोजी डावी चारी क्र.१, उजवी चारी क्र.६ व थेट विमोचक क्र.१ वरून गुळसडी, कुंभेज, सरपडोह, शेलगाव तर ११ ते १३ मे उजवी चारी क्र.२ व देवळाली वितरिकेवरून देवळाली, पांडे, खडकेवाडी या गावांना पाणी मिळणार आहे.

# जेऊर-चिखलठाण रस्त्याची दुरावस्था - डांबरीकरणाची नागरीकांची मागणी

करमाळा(सं.प्र.) : जेऊर-चिखलठाण रस्ता अत्यंत खराब झाला असून, या रस्त्याचे पक्के डांबरीकरण करावे; अशी मागणी या भागातील नागरीकांनी केली आहे. जेऊर-चिखलठाण रस्ता जादा रहदारीचा असून शेटफळ, केडगाव, चिखलठाण नं.१, २, कुगाव या गावाला जाणारा तसेच उजनी जलाशयातून जलमार्गाने इंदापूर, पुणे या शहराला जोडणारा महत्वाचा रस्ता आहे. परंतू या रस्त्याची गेल्या दहा वर्षापासून दयनीय अवस्था झाली आहे. सध्या चिखलठाण येथील प्रसिध्द देवस्थान कोटलिंग देवाची यात्रा १३ एप्रिलला आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात मुरूम टाकून खड्डे बुजविण्याचे काम शासनाने चालू केले आहे. यात्रेपुरते तात्पुरते हे काम ठिक असलेतरी येणाऱ्या काळात मात्र पावसाळ्यात परत आहे तशीच अवस्था या रस्त्याची होणार आहे. त्यामुळे आताच्या रस्त्याचे पंतप्रधान योजनेतून चांगल्या स्वरूपाचा डांबरीकरणाचा रस्ता होणे गरजेचे आहे. या भागात केळी व अन्य फळांचा शेतीमाल घेण्यासाठी व्यापारी याच रस्त्याने येतात. परंतू रस्ता खराब असल्यामुळे आता हे व्यापारी शेतीमाल घेण्यास टाळाटाळ करत आहेत. तसेच रात्री-अपरात्री आजारी पेशंटला तातडीच्या उपचारासाठी या रस्त्याने घेऊन जाणे मुश्कील झाले आहे. या भागात मोठमोठे राजकीय पुढारी आहेत. परंतू गेल्या दहा वर्षात चांगला रस्ता झाला नाही, ही वस्तुस्थिती आहे. शासनाने या भागातील रस्ता नवीन होण्यासाठी तातडीने पावले उचलावीत अन्यथा येणाऱ्या निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला

# राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत यश प्राप्त केल्याबद्दल सायली पाखरे हिचा सत्कार



करमाळा(सं.प्र.) : उमरड येथील सायली ज्ञानदेव पाखरे हिचा राष्ट्रीय उत्तरलेखन स्पर्धेत दुसरा क्रमांक आल्याबद्दल उमरड ग्रामपंचायती तर्फे तिचा सत्कार करण्यात आला आहे. सायली पाखरे ही उमरड येथील विद्यार्थीनी असून तिचा नवोदय विद्यालय पोखरापूर (मोहोळ) येथे शिकत आहे. नवोदय विद्यालयाच्या माध्यमातून तिचे यावर्षीचे शिक्षण जवाहरलाल नवोदय विद्यालय राजस्थान येथे सुरु आहे. भारत सरकार अंतर्गत पोस्ट विभागाच्या वतीने राष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत सायली पाखरे हिने राजस्थान येथील सवाईमाधवपूर येथून भाग घेतला होता. या स्पर्धेत तिचा दुसरा क्रमांक आला आहे. त्याबद्दल तिचा उमरड ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी सरपंच लालासाहेब पडवळे, माजी सरपंच बापूसाहेब चोरमले तसेच मच्छिंद्र चौधरी, अमोल खंडागळे, दत्तू वलटे, धनंजय बदे, महेंद्र पाखरे, पोपट कदम, मेजर देविदास पाखरे, ज्ञानेश्वर पाखरे, आण्णासाहेब पाखरे, श्री.वेताळ, बबलू कदम, संतोष पाखरे, महेंद्र पाखरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व उपस्थितांचे आभार नंदकिशोर वलटे यांनी मानले.

## हार्दिक अभिनंदन




आमचे मित्र व हितचिंतक
**श्री.सतीश टांगडे सर** यांची कन्या
**कु.जान्हवी सतीश टांगडे** हिने वैद्यकिय क्षेत्रातील एम.बी.बी.एस. ही पदवी प्राप्त केल्याबद्दल तसेच माजी नगरसेवक **डॉ.अविनाश घोलप** यांचे सुपुत्र **चि.ऋतिक अविनाश घोलप** हे एम.बी.बी.एस.च्या फायनल परीक्षेत प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन ! तसेच मिरगव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी **सौ.कृति जोतिराम लावंड** यांची निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !

शुभेच्छुक
**जय बजरंग बली**
पोंधवडी, ता.करमाळा.
मो.नं.८८८८३३३६३८
**टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स**

---



## सस्नेह निमंत्रण



# क्रांतीसुर्य प्रतिष्ठान
करमाळा., जि.सोलापूर आयोजित

## क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले जयंती उत्सव
११ एप्रिल २०२३

**कार्यक्रमाची रूपरेषा**

- **स्मारकास पुष्पहार अर्पण :** सकाळी १०.०० वाजता
- **भव्य रक्तदान शिबीर :** सकाळी ११.०० ते २.०० पर्यंत

**स्थळ :** म.फुले स्मारकाशेजारी, करमाळा.



सुप्रसिध्द व्याख्याते
**मा.श्री.खंडू डोईफोडे** यांचे
**जाहीर व्याख्यान** सायं. ४ वा.
**विषय :** "क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील एक महानायक"
तरी या कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे...!

**स्थळ : यशकल्याणी सेवाभवन, पुणे रोड, करमाळा.**

---






# शिवजयंती उत्सव समिती, देवळाली
## मा. राहुल कानगुडे, सुधीर आवटे मित्र परिवार
आयोजित
## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त
## भव्य खुल्या राज्यस्तरीय डान्स स्पर्धा - २०२३


| * प्रथम बक्षिस * | * व्दितीय बक्षिस * | * तृतीय बक्षिस * | * चतुर्थ बक्षिस * | * उत्तेजनार्थ * |
|---|---|---|---|---|
| | | | | पाच बक्षिसे प्रत्येकी |
| ११०००/- | ७०००/- | ५०००/- | ३०००/- | १०००/- |
| मा. श्री. गहिनीनाथ चंद्रसेन ननवरे (माजी सभापती, पं.स.करमाळा) | मा. श्री. सचिन अरूण कानगुडे (सामाजिक कार्यकर्ते) | मा. श्री.सतिश रघुनाथ कानगुडे (युवा नेते) | श्री. संतोष बिभिषण घाडगे (ईगल आईज् सेक्युरिटी सोल्युशन, पुणे) | मा. श्री. भरत धनंजय चोपडे (चेअरमन) |

नियम :- १)स्पर्धकाचे गाणे जास्तीत जास्त ३ मिनिटाचे असावे. जास्त असल्यास स्पर्धेतून बाद करण्यात येईल. २) लिस्टप्रमाणे गाणे वाजवली जातील पालकांनी हुज्जत घातल्यास स्पर्धेतून बाद करण्यात येईल ३) स्पर्धेत तांत्रिक/नैसर्गिक अडचण आल्यास निर्णय आयोजक घेतील. ४) प्रथम नोंदणी करणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल.

**आयोजक :- सुधीर आवटे व राहुल कानगुडे मित्र परिवार. देवळाली**
**वार :- बुधवार दि. १९/०४/२०२३ रोजी सायं. ७.००**

नाव नोंदणी संपर्क
सुधीर आवटे, मो. ९५५२३९३५३२
अक्षय कांबळे, मो. ८०८७५४५६१०

**स्थळ :- प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासमोर, नागनाथ महाराज मंदिराजवळ, देवळाली**




# शिंदे हॉस्पिटल

शाहुनगर, बायपास रोड, करमाळा

**उपलब्ध सेवा**

- ऑर्थोस्कोपी,नसांच्या इंज्युरी वरील उपचार
- सांधे रोपण शस्त्रक्रिया
- संधीवातावर उपचार
- सांध्याची झीज,गादी फाटणे यावरील उपचार
- इलिझारोव्ह (रशियन पध्दत)
- सर्व प्रकारचे फ्रॅक्चर्स निदान व उपचार
- अत्याधुनिक पध्दतीने सर्व हाडांच्या आजारांवर उपचार
- फिजिओथेरपी युनिट
- मेडिकल स्टोअर्स
- कॉम्प्युटराईज्ड लॅबोरेटरी

**उपलब्ध सुविधा**

- एक्स-रे मशिन
- स्ट्रेचर,लिफ्ट सुविधा
- जनरेटर,इनव्र्हटर,युपीएस बॅकअप
- सुसज्ज २ ऑपरेशन थिएटर
- सोलर सुविधा
- सी.आर्म मशीन, सेंट्रल ऑक्सिजन
- मोटाराईज्ड ऑपरेशन टेबल
- मॉनिटर्स व पल्स ऑक्सिमीटर
- इलेक्ट्रॉनिक ट्रॅक्शन
- एस.डब्ल्यु.डी / आय.एफ.टी.

## पाहिजेत

| क्र. | रिक्त पदांची नावे | जागा | क्र. | रिक्त पदांची नावे | जागा |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.एम.ओ. M.B.B.S./B.A.M.S./B.H.M.S. | ४ | ९ | रिसेप्सनीस्ट | ३ |
| २ | सिस्टर / ब्रदर A.N.M. / G.N.M. | ३ | १० | आया | ४ |
| ३ | ओ.टी.असिस्टंट | ३ | ११ | वार्ड बॉय | ४ |
| ४ | एक्स-रे टेक्निशियन | २ | १२ | वॉचमन | २ |
| ५ | कॉम्प्युटर ऑपरेटर | १ | १३ | ड्रायव्हर | १ |
| ६ | अकौंटंट | १ | १४ | स्वीपर | १ |
| ७ | फॉर्मासिस्ट | २ | १५ | प्लंम्बर (ऑन कॉल) | |
| ८ | व्यवस्थापक | १ | १६ | इलेक्ट्रिशियन (ऑन कॉल) | |

मुलाखतीसाठी सर्व शैक्षणिक कागदपत्रे आवश्यक आहे.


ऑपरेशन थिएटर-१


ऑपरेशन थिएटर-२


निर्जंतुकीकरण रुम


एक्स-रे रुम


ट्रॉमा आय.सी.यु.


ए/सी डीलक्स रुम


सेमी स्पेशल रुम


रिसेप्शन हॉल

**संपर्क** Ph.No.(02182) 299 525 Mo.8275915658 / 8484029479





बन्सी(आबा) घाडगे
(अध्यक्ष, शिक्षण संस्था झरे)



ज्योतिर्लिंग शिक्षण प्रसारक मंडळ झरे संचलित नामदेवराव जगताप माध्यमिक विद्यालय, झरे चे संस्थापक/अध्यक्ष मा.श्री.बन्सी(आबा) घाडगे यांची कन्या

**सौ.अर्चना घाडगे-जाधव**

यांची सातारा येथे 'लेखापरीक्षक' म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल

**हार्दिक अभिनंदन !**



शुभेच्छुक

- नामदेवराव जगताप माध्य. विद्यालय, झरे
- कुलस्वामिनी प्रायमरी स्कुल, झरे

सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद



वैद्यकिय क्षेत्रातील M.B.B.S. च्या फायनल परीक्षेत करमाळा येथील डॉ.अविनाश घोलप यांचे सुपुत्र

**चि.ऋतिक अविनाश घोलप**

हे प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाल्याबद्दल...

हार्दिक **अभिनंदन**

वैद्यकिय क्षेत्रातील पुढील वाटचालीस शुभेच्छा..!





शुभेच्छुक

**कमलाई लॅबोरेटरी**

जीन मैदान, गाळा नं.१५, पुणे रोड, करमाळा.

# दहिगाव योजनेच्या कामासाठी १०१ कोटीचे टेंडर मंजूर : आ.शिंदे



करमाळा(सं.प्र.) : तालुक्याच्या पूर्व भागाला वरदान ठरलेल्या दहिगाव उपसा सिंचन योजनेचे टप्पा १ व टप्पा २ साठी १०१ कोटी रूपयाचे टेंडर मंजूर झाले असून यामधून वितरिका, लघुवितरीका, उपलघुवितरिका या वितरण व्यवस्थेच्या कामासह सर्व कामे पूर्ण होऊन १० हजार ५०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे; अशी माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली.

ई निविदाचा कालावधी २८ मार्च रोजी सुरू झालेला असून २७ एप्रिल ही त्याची अंतिम तारीख आहे. तसेच जिओ टॅगिंगचा कालावधी हा ३० मार्चला सुरू झालेला असून ४ एप्रिल ही त्याची अंतिम मुदत होती. सदर निविदा उघडण्याची तारीख १८ एप्रिल असून त्या दिवशी किंवा त्यानंतर ही निविदा माहितीसाठी सर्वांना उपलब्ध होणार आहे.

दहिगाव उपसासिंचन योजनेसाठी सदर टेंडर प्रक्रिया राबविण्यासाठी आपण २०१९ पासून महाविकास आघाडी सरकार च्या कार्यकाळापासून प्रयत्नशील होतो. आपण ३४५ कोटी रूपयांची दुसरी सुधारीत प्रशासकीय मान्यता या योजनेला मिळवून दिलेली होती. तत्कालीन जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्याकडे दहिगाव उपसासिंचन योजनेसाठी आपण आर्थिक तरतूद अर्थसंकल्प मध्ये करण्याची विनंती केलेली होती. त्यामुळेच आज दहिगाव उपसासिंचन योजनेच्या इतिहासामधील सर्वोच्च म्हणजेच १०१ कोटीचे टेंडर मंजूर झाले आहे. यामुळे दहिगाव उपसासिंचन योजनेची सर्व कामे पूर्ण होऊन १० हजार ५०० हेक्टर क्षेत्र ओलिता–खाली येण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे; अशीही माहिती आमदार शिंदे यांनी दिली.

> दहिगाव उपसासिंचन योजनेच्या डावी चारी ६ व उजवी चारी ११ अशा एकूण १७ लघुवितरीका असून यापैकी ज्या लघुवितरीकेची कामे शुन्य टक्के झालेली आहेत, अशा लघुवितरीकेची कामे प्राधान्याने केली जाणार आहेत. दहिगाव उपसासिंचन योजनेच्या उजनी कार्यक्षेत्रातील वंचित भागांना यामुळे प्राधान्याने पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कार्यारंभ आदेश मिळून लवकरच या योजनेची कामे पूर्ण होतील.
>
> **.. संजय अवताडे (उपअभियंता, कुकडी डावा कालवा उपविभाग)**

# १२ एप्रिल रोजी पोथरे येथे मातृ-पितृ पुजन सोहळा

करमाळा(सं.प्र.) : पोथरे येथे ६ एप्रिल पासून अखंड हरिनाम सप्ताह सुरू झाला असून, १२ एप्रिल रोजी मातृ–पितृ पुजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

अखंड हरिनाम सप्ताहात पहाटे काकडा, भजन, विष्णु सहस्त्रनाम, गाथा भजन, प्रवचन, हरिपाठ, हरिकिर्तन व हरिजागर असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत. तसेच या सप्ताहात ह.भ.प.सुभेदार महाराज झिंजाडे, दत्तात्रय महारजा नंदरगे, अशोक महाराज दळवी, भारत महाराज झिंजाडे, रामकृष्ण महाराज रंदवे, बंडोपंत महाराज कुलकणी, विलास महाराज शिंदे यांचे प्रवचनाचे तर बबन महाराज शिंपी, गणेश महाराज भोरे, ॲड.बाबूराव हिरडे, माऊली महाराज झोळ, रविंद्र महाराज पोटे, बालाजी महाराज शेंडगे, माऊली महाराज कोठूळे यांचे किर्तनाचे कार्यक्रम होणार आहेत. बुधवारी १२ एप्रिल रोजी मातृ–पितृ पुजन कार्यक्रम होणार असून, यामध्ये सायंकाळी चार ते सात या दरम्यान माता–पित्यांची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून त्यानंतर पाद्य पुजा व सन्मान सोहळा संपन्न होणार आहे. गुरूवारी १३ एप्रिल रोजी सकाळी दहा ते बारा भजन सम्राट गुरूवर्य ह.भ.प.हनुमंत महाराज मते (दहिफळकर) यांचे काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. तरी या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा; असे आवाहन पोथरे ग्रामस्थांनी केले.


# श्री गजानन अगरबत्ती

- सुगंधी अगरबत्ती ● कापूर
- अत्तर ● धूप ● भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !



पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)


## करमाळा शहरात घाणीचे साम्राज्य –न.पा.प्रशासनाचे दुर्लक्ष

# काँग्रेस पक्षाच्या वतीने न.पा.समोर गाळ फेक आंदोलनाचा इशारा




करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरात सध्या सर्वत्र घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून, करमाळा नगरपालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे. येत्या १५ दिवसात कारवाई न झाल्यास काँग्रेस पक्षाच्या वतीने नगरपालिकेसमोर गाळ फेकण्यात येईल; असा इशारा युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष सुजय जगताप यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनाव्दारे दिला आहे. प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की करमाळा शहरास कोणी वाली राहिला नसून, जिकडे–तिकडे घाणीचे साम्राज्य झाले आहे. विविध भागातील गटारी तुंबल्या आहेत. कचरा रस्त्यावर येत आहे. घाणीचे ढिग जागोजागी दिसून येतात, त्यामुळे सर्वत्र डास व रोगराई पसरण्यास सुरूवात झाली आहे. काही ठिकाणचे पेव्हींग ब्लॉक उचकटून पडले आहेत. त्यात पाणी साचते त्यामुळे चालताही येत नाही. पंधरा दिवसांच्या आत उपाययोजना न झाल्यास शहरातील घाण नगरपालिकेसमोर आणून टाकली जाईल व यास करमाळा नगरपालिका जबाबदार राहील; असा इशारा या निवेदना व्दारे देण्यात आला आहे. निवेदनाच्या प्रती पोलीस निरीक्षक तहसीलदार यांना दिल्या आहे

# जान्हवी टांगडे हिला वैद्यकिय क्षेत्रातील एमबीबीएसची पदवी प्राप्त



करमाळा(सं.प्र.) : शाहूनगर येथील रहिवाशी जान्हवी सतीश टांगडे हिने वैद्यकिय क्षेत्रातील एमबीबीएस ची पदवी प्राप्त केली आहे. जान्हवी ही करमाळा येथील शिक्षक सतीश टांगडे आणि शिक्षिका चंद्रकला टांगडे यांची कन्या आहे. जान्हवी हिचे प्राथमिक शिक्षण न.पा.च्या कै.साधनाबाई नामदेवराव जगताप येथे झाले. माध्यमिक शिक्षण म.गांधी विद्यालय करमाळा येथे तर उच्च माध्यमिक शिक्षण ए.डी.जोशी ज्यु.कॉलेज सोलापूर येथे झाले. वैद्यकिय शिक्षण श्री विठ्ठलराव विखे–पाटील मेडिकल कॉलेज अहमदनगर येथे पूर्ण केले.

एमबीबीएस चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर जान्हवी हिचा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सन्मान केला. भविष्यात बालरोग तज्ञ होवून सेवा देण्याची इच्छा असल्याचे जान्हवी हिने सांगितले.

# प्रा.डॉ.सचिन मोरे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.) : मन्वंतर सामाजिक संस्थे तर्फे दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार अहमदनगर महाविद्यालयाचे इतिहास विभागाचे प्राध्यापक डॉ.सचिन मोरे यांना प्रदान करण्यात आला. प्रा.डॉ.सचिन मोरे हे करमाळा येथील माजी नगराध्यक्ष ज्ञानेश्वर मोरे यांचे सुपुत्र आहेत. ज्येष्ठ समाजसेवक आणि नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड महाराष्ट्र युनिटचे अध्यक्ष रामेश्वर कलंत्री यांचे हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

गेल्या १७ वर्षापासून अध्यापनाच्या क्षेत्रात कार्यरत असणारे डॉ.सचिन मोरे बहुजन आणि दिव्यांग मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम करतात. या कार्याबद्दल हा पुरस्कार त्यांना देण्यात आला. प्रा.डॉ.मोरे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सावंतगल्ली येथील छत्रपती शिवाजी तरूण मंडळाच्यावतीने त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.


# आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर



रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
● सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
fastrack
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.

दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

# विश्वासास पात्र ठरल्यानेच प्रा.अर्जुनराव सरक यांचेवर सचिव पदाची जबाबदारी : नारायण पाटील

करमाळा(सं.प्र.) : प्रा.अर्जुनराव सरक यांनी त्यांचेवर टाकलेली जबाबदारी पारदर्शक व विश्वासाने पार पाडली आहे. त्यांच्यावर टाकलेल्या विश्वासास ते पात्र झाले आहेत. त्यामुळेच त्यांचेवर भारत शैक्षणिक संकुलासारख्या भारत शिक्षण प्रसारक मंडळ या मोठ्या संस्थेची जबाबदारी दिली आहे. सचिव पदाची जबाबदारी ते विश्वासाने व प्रामाणिकपणे चोख पार पाडून संस्थेच्या प्रगतीचा वाढता आलेख कायम ठेवतील; असा विश्वास माजी आमदार व भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नारायण(आबा) पाटील यांनी व्यक्त केला.

जेऊर येथील भारत हायस्कुल ज्युनिअर कॉलेजच्या व्यवसाय अभ्यासक्रम विभागाचे प्रमुख प्रा.अर्जुनराव सरक यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित सत्कार समारंभ व ग्रंथतुला कार्यक्रमात श्री.पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार दत्तात्रय सावंत हे होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने नामांकित विचारवंत व लेखक प्राचार्य डॉ.महेंद्र कदम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी डॉ.कदम यांनी ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेपुढील आव्हाने व संधी या विषयावर मौलिक विचार मांडले. सेवापुर्तीनिमित्ताने प्रा.अर्जुन सरक यांची ग्रंथतुला करण्यात आली.





अध्यक्षस्थानावरून बोलताना माजी आमदार सावंत म्हणाले, की भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे शिक्षण क्षेत्रातील योगदान ग्रामीण शिक्षण व्यवस्थेला बळकटी देणारे आहे. प्राथमिक तसेच माध्यमिक शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण सदैव तत्पर असून नारायण पाटील यांच्याशी आपले ऋणानुबंध घट्ट व राजकारणापलिकडे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी व्यासपीठावर माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीप तळेकर, अनिरूध्द कांबळे, जि.प.सदस्या सवितादेवी राजेभोसले शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, माजी संचालक धुळा कोकरे, नवनाथ झोळ, उपसभापती गणेश चौधरी, माजी सभापती शेखर गाडे, यशवंत चव्हाण महाविद्यालयाचे माजी प्राचार्य जयप्रकाश बिले, महेंद्र पाटील, प्राचार्य मच्छिंद्र नुस्ते, यशकल्याणीचे गणेश करे-पाटील, संस्था उपाध्यक्ष राजूशेठ गादीया, संचालक संपतलाल राठोड, राजन पाटील, संदिप कोठारी, विकास पाथ्रुडकर, प्राचार्य डॉ.अनंत शिंगाडे, प्राचार्य केशव दहिभाते, मुख्याध्यापक दिपक व्यवहारे, माजी प्राचार्य प्र.गो.मेहता, गोडसे सर, मरळ सर, ठोकळ सर, अनभुले सर, शेंडे मॅडम, घाडगे भाऊसाहेब आदी उपस्थित होते.

यावेळी यशकल्याणी संस्थेच्या वतीने करे-पाटील यांनी प्रा.सरक यांचा मानपत्र देऊन सन्मान केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पाटील गटाचे प्रवक्ते सुनील तळेकर यांनी केले तर स्वागत पांडूरंग वाघमारे यांनी केले. आभार प्राचार्य केशव दहिभाते यांनी मानले. सुत्रसंचालन अंगद पठाडे यांनी केले. विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांनी प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या.यावेळी सोलापूर जिल्हा परिषद, करमाळा पंचायत समिती, भारत शैक्षणिक संकुल, नारायण पाटील पतसंस्था, ग्रामपंचायत जेऊर, श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना पंढरपूर, भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ यासह अनेक संस्थांच्या वतीने प्रा.सरक यांचा सत्कार करण्यात आला.

## काँग्रेसचे सत्याग्रह आंदोलन

करमाळा(सं.प्र.) : काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यावर झालेल्या कारवाईचा निषेध करण्यासाठी करमाळा तहसील कार्यालय समोर १५ ते २० एप्रिल दरम्यान सत्याग्रह आंदोलन केले जाणार आहे; अशी माहिती काँग्रेसचे तालुका अध्यक्ष प्रताप जगताप यांनी दिली. श्री.जगताप म्हणाले, की राहुल गांधी यांनी काढलेल्या भारत जोडो यात्रेला नागरीकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यातूनच भाजप सरकार अस्वस्थ झाले असून, विरोधी पक्षाचा आवाज दाबण्याचे काम सुरू केले आहे. मात्र हा प्रकार आम्ही कधीही सहन करणार नाही. त्यांच्यावर केलेली कारवाई ही निषेधार्ह असून आम्ही सर्व काँग्रेसचे कार्यकर्ते एकत्र येऊन आंदोलन करणार आहोत.

या सत्याग्रह आंदोलनात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील हे देखील सहभागी होणार आहेत. संपूर्ण जिल्ह्यातील तारखा निश्चित झाल्यानंतर १५ ते २० एप्रिल दरम्यान एक दिवस हे आंदोलन केले जाणार असल्याचेही श्री.जगताप यांनी सांगितले.

## डॉ.आंबेडकर व म.फुले जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

करमाळा(सं.प्र.) : शिव-फुले-शाहू-आंबेडकर जयंती उत्सव समिती आणि नागेश कांबळे मित्रपरिवार यांचे वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर व म.फुले जयंतीनिमित्त ९ ते १४ एप्रिल विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ९ एप्रिलला यशकल्याणी सेवाभवन येथे खुल्या व लहान गटात बुध्दीबळ स्पर्धा, १० एप्रिलला श्रीमंत कोकाटे यांचे भारतीय संविधान व लोकशाहीचे भविष्य धोक्यात आहे काय ? या विषयावर व्याख्यान., १३ एप्रिलला राज्यस्तरीय डान्स स्पर्धा घेण्यात येणार आहे. यामध्ये अनुक्रमे १५ हजार, १० हजार, ७ हजार रु. असे बक्षीस दिले जाणार आहे. १४ एप्रिलला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन उत्सव समितीचे संस्थापक नागेश कांबळे, माजी नगराध्यक्ष दिपक ओहोळ, अध्यक्ष लक्ष्मणराव भोसले यांनी केले आहे.

## १३ एप्रिलला चिखलठाण यात्रा

करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील प्रसिध्द व निसर्गरम्य परिसरात असलेले चिखलठाण येथील जागृत देवस्थान श्री कोटलिंग ची यात्रा १३ एप्रिलला होणार आहे. या दिवशी सकाळी दंडवत, महाप्रसाद व रात्री बारा वाजता नेत्रदिपक असा श्री कोटलिंग देवाचा छबीना निघणार आहे. १४ एप्रिलला बाजार असून, १५ एप्रिलला शिळा बाजार व तेल उतरणेचा कार्यक्रम होणार आहे. . श्री कोटलिंग यात्रा कमेटीच्या वतीने यात्रेची सर्व तयारी करण्यात आली आहे.

श्री जगदंबा टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स्
पांडे, ता.करमाळा., जि.सोलापूर
आपल्या लाडक्या मुला-मुलीच्या लग्नाच्या शुभकार्यासाठी किंवा इतर समारंभासाठी ४० प्रवासी सीट असलेली टाटा बस
भाड्याने मिळेल

आमच्याकडे क्रुझर तसेच ईरटिगा व स्विफ्ट डिझायर इ. गाड्या योग्य दरात भाड्याने मिळतील..
करमाळा - पुणे - करमाळा डेली बससेवा
लवकरच आपल्या सेवेत..!
जाण्याचा मार्ग : वीट, कोर्टी, कुंभारगाव, जिंती, भिगवण, हडपसर, स्वारगेट, शिवाजीनगर, काळेवाडी, डांगे चौक
● पार्सल सेवा व महिलांसाठी राखीव सीट
● वेळ : सकाळी ५ वा. ४५ मि.
● ठिकाण : करमाळा एस.टी.स्टॅन्ड समोर, हॉटेल मुक्ताई शेजारी., करमाळा.

संपर्क
प्रशांत कांबळे (9921404775 / 7057067003)
संतोष कांबळे (7741020164), किरण कांबळे (9822285691)

कोटलिंग एंटरप्रायजेस्

प्रोप्रा : निलेश कामटे
संपर्क : मो.7709875137
मो.9822313841
आमचेकडे वाळू व सिमेंट विरहित प्लास्टर बॅग, सनला तसेच बांधकाम स्टाईल चिटकवण्याची बॅग, बांधकामासाठी बॅग व प्लास्टर बॅग मिळेल. एकवेळ अवश्य भेट द्या !
पत्ता : छत्रपती चौक, जुना बायपास, कमलादेवी मशनरी समोर, करमाळा.

# कुंभेज येथे आ.शिंदे यांचे हस्ते विविध विकासकामांचे भुमीपूजन




करमाळा (सं.प्र.): कुंभेज येथे जलजीवन मिशन योजने अंतर्गत पाणीपुरवठा योजना (रक्कम रू.१ कोटी ५९ लाख ५० हजार ४१७) व आमदार स्थानिक विकास निधी मधून मंजूर करण्यात आलेले साळुंखे वस्ती येथे तालीम बांधणे (रक्कम रू.१५ लाख) या कामांचे भूमीपुजन आमदार संजयमामा शिंदे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी लव्हे गावचे सरपंच विलास पाटील, महाराष्ट्र केसरी पै.चंद्रहास निमगिरे, पै.अनिल फाटके, पै.अगस्ती मुटके, महावीर साळुंखे, ग्रा.पं.सदस्य आण्णा साळुंखे, वरकटणेचे सरपंच बापू तनपुरे, कोंढेजचे आप्पा आरणे, रमेश गायकवाड, नामदेव मुटके, रावसाहेब सातव, नितीन भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ.शिंदे म्हणाले, की विविध विकास कामे करत राहणे, वेगवेगळ्या योजनांना निधी आणणे या गोष्टीला आपले प्राधान्य असते. केलेल्या कामाचा गवगवा करणे, भुमीपूजन, उद्घाटन करणे, पाणीपुजन करणे याच गोष्टीला जर मी वेळ देत बसलोतर इतर विकासकामे राबविण्यासाठी आपल्याकडे वेळ राहणारन ाही. त्यामुळे मी अशा प्रसिध्दीच्या कामांना फाटा देत असतो. परंतू उद्घाटन दिसत नाही, याचा अर्थ विकास थांबला असा होत नाही. तर ज्या त्या गावामध्ये, ज्या त्या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर ती विकासकामे सुरू आहेत आणि त्यासाठी माझा सातत्याने पाठपुरावा सुरु असतो. कुंभेजसाठीही रस्ते, पाणी, तालीम यासाठी मुबलक निधी उपलब्ध करून दिला असून भविष्यकाळामध्ये कुंभेज या ठिकाणी सबस्टेशन झालेच पाहिजे; या दृटीने माझे नियोजन सुरू आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.विकास वीर यांनी केले. आभार ग्रामपंचायत सदस्य आण्णा साळुंखे यांनी मानले.

# प्रयत्नाच्या जोरावर युवकाची यशस्वी झेप

## माऊली झिंजाडे यांचा अनोखा प्रवास



**कोशिश करनेवालोंकी कभी हार नही होती । लहरोंसे डरकर नौका पार नही होती ...।** हरिवंशराय बच्चन यांनी प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीला कधीही अपयश येत नाही. असे आपल्या काव्यातून खूप समर्पकपणे मांडले आहे. याची प्रचिती पोथरे येथील माऊली रंगनाथ झिंजाडे या २५ वर्षाच्या युवकात आली आहे. स्वत:चे शिक्षण घेतानाच घराच्या प्रगतीसाठी केलेले प्रयत्न आणि त्यात मिळवलेले यश ही बाब श्री.झिंजाडे यांच्या वाटचालीतून स्पष्ट झालेली आहे. खरंतर माऊली झिंजाडे हा माध्यमिक शाळेत असतानाच आपली शेती प्रगतशील झाली पाहिजे, शेतीतून उत्पन्न वाढले पाहिजे आणि त्यातून स्वत:चे घर, स्वत:ची चार चाकी गाडी आली पाहिजे, हे स्वप्नं पाहिले त्यानंतर श्री.झिंजाडे यांनी शिक्षणाबरोबरच शेतीमध्ये लिंबोणी, ऊस आणि तूर या तीन पिकावर विशेष लक्ष दिले. आणि पाच एकर बागायत जमिनीतून लाखो रूपयाचे उत्पन्न मिळवण्यास सुरुवात केली. या वाटचालीत तीन बहिणींचे विवाह करण्याची जबाबदारी होतीच. ती जबाबदारीही आई-वडिलांच्या पाठींब्याने सहजरित्या पार पाडून एम.कॉम पर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर कमलाभवानी साखर कारखान्यात अकाउंट विभागात जॉबही सुरू केला आहे. हे सर्व असतानाच मृदुंग वाजविणे, हर्मोनियम वाजविणे, भजन म्हणणे या कलाही आत्मसात केल्या आहेत. हे सर्व सुरू असतानाच शेतीतील सुधारणा झाल्या की शेतातच सुंदर घरही बांधले आहे व नुकतीच नवीन बोलोरो (चारचाकी गाडी) आणली आहे. या सर्व वाटचालीत वडील रंगनाथ झिंजाडे व आई मैनाबाई झिंजाडे यांचे मिळालेले पाठबळ व संस्कार यामुळेच माऊली झिंजाडे यांना अल्प वयात प्रगतीची झेप घेता आली.




CANCER
RESEARCH
KARMALA
करमाळा आय.एम.ए.संचलित
२५ एप्रिल २०२३
-: वेळ :-
सकाळी १० ते
दुपारी १ वाजेपर्यंत
एप्रिल महिन्यापासून
दर महिन्याचा ४ था मंगळवार आपल्या सेवेत...
तुमच्या सामर्थ्याने
आणि आमच्या कौशल्याने...
कर्करोग तपासणी ओपीडी मध्ये तज्ज्ञांचा सल्ला घ्या.
शरीरात कोणतीही गाठ किंवा सूज
एखादी जखम जी बरी होत नाही
जेवण/पाणी गिळण्यास अडचण
श्वास घेण्यास अडचण
शरीरातून रक्तस्त्राव होतो का ?
अस्पष्टपणे वजन कमी होणे
आवाजात सतत बदल
भूक कमी होणे
अस्पष्टपणे ताप आणि थकवा
स्तनात गाठ / सुज आहे का ?
स्तनातून रक्त / पाणी / पस निघणे
मासिक पाळीत अनियमितता
महिलांसाठी स्तन तपासणी
मॅमोग्राफी
तोंडाची तपासणी
जेनटिक काउन्सलिंग
ब्रेस्ट कॅन्सर,फुफुसाचा कॅन्सर
हेड अ‍ॅन्ड नेक कॅन्सर
रक्ताचा व हाडाचा कॅन्सर
गर्भपिशवीचा कॅन्सर,सर्विक्स कॅन्सर
CHEMOTHERAPY
TARGETED THERAPY
IMMUNOTHERAPY
HORMONAL THERAPY
नाव नोंदणी आवश्यक
संपर्क
मो.८६६९७७०२४८
७५०७३१४१३३
डॉ.प्रतिक पाटील.
MBBS MD
कन्सल्टंट जुपिटर हॉस्पिटल,पुणे.
Dr.NB (Medical & Haemat Oncology)
Fellow Thoracic Onclogy (Michigan,USA)
Fellow ECMO (UK)
तज्ज्ञ डॉक्टरांचा मोफत सल्ला
मंगळवार २५ एप्रिल २०२३ वेळ:- सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत
स्थळ:- जाधव पाटील हॉस्पिटल अर्बन बँक शेजारी,मेन रोड करमाळा.


खास सन, जयंत्ती उत्सव साठी आलेल्या
नाविन्य पुर्ण व आकर्षक व्हरायटीच्या
खरेदीचा आनंद घ्या...
यश
कलेक्शन
YASH COLLECTION
मेनरोड, जय महाराष्ट्र चौक, करमाळा
घेऊन जा हमखास गिफ्ट...
फेस्टीवल गिफ्ट
ऑफर
डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती
अक्षय तृतीया व
रमजान ईद
निमित्त खास ऑफर....
...ऑफर कालावधी...
दि.३/४/२०२३ ते २१/४/२०२३ पर्यंत.


माझी पुतणी
कु.जान्हवी सतिश टांगडे
हिने वैद्यकिय क्षेत्रातील M.B.B.S. ही पदवी
प्राप्त केल्याबद्दल तिचे... हार्दिक अभिनंदन
अरूण(काका) टांगडे
(खजिनदार, राष्ट्रवादी काँग्रेस करमाळा)
शुभेच्छुक
श्री.सतीश नामदेव टांगडे (वडील), सौ.चंद्रकला सतीश टांगडे (आई)
काका : श्री.रमेश नामदेव टांगडे, श्री.नंदकुमार नामदेव टांगडे, श्री.संतोष पांडूरंग टांगडे
श्री.अरूण पांडूरंग टांगडे
भाऊ : अनुप नंदकुमार टांगडे, संदीप नंदकुमार टांगडे, प्रताप राजेंद्र टांगडे
शिवम संतोष टांगडे, यशराज अरूण टांगडे
सौ.अश्विनी रविंद्र काळे